# झाडे लावा झाडे जगवा निबंध

मानवाला निसर्गाने दिलेल्या परोपकार मधील सर्वात अमूल्य ठेवा म्हणजे झाडे. जे अवघ्या जीवन सृष्टी मधी संतुलन ठेवण्याचे काम करते. झाडे हे मानवी जीवनातील सर्वात महत्त्वाचा भाग आहे. झाडे मानवाला ऑक्सीजन, फळ पाले भाज्या, औषधी, लाकूड, सावली प्रदान करतात.आणि मानव त्याची परतफेड वृक्षतोड करून करत असतो. अवघ्या जगात एका दिवसात सुमारे एक लाख हुन अधिक वृक्ष मानव त्याच्या स्वार्था पोटी तोडत असतो.

झाडे मानवाला नव्हेतर संपूर्ण जीवन सृष्टीला अमूल्य देणगी देत असतो. झाडे मातीतील विषारी पदार्थ शोषून घेतात, ऋतू चक्र संतुलित ठेवतो, जैवविविधता राखण्यास मदत करते, जमिनीची धूप होऊ देत नाही, हवा शुद्ध करते, पाणीसाठी करते, तापमान नियंत्रण करते, वातावरण असलेले दूषित वायू शोषून घेते, आजारांपासून बचाव करते , पूर रोखण्यास मदत करते ,जमीन सुपीक बनवते अशा अनेक अमूल्य विनामूल्य देणगी झाडे अवघ्या जीवन सृष्टीला देत असतो.

वर्तमान युगात अतिशय वेगाने झाडे तोंडली जात आहेत. ज्याचा परिणाम निसर्गावर, वातावरणावर दिवसेंदिवस वाढतच जात आहे. वृक्ष तोंड मुळे अनेक पक्षांची प्रजाती नष्ट झाली आहेत.तर काही लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. कारण प्रतेक जातीचा पक्षी ठराविक वृक्षावर घरटी बनवत असतो,परंतु स्थानिक लोकांनी वृक्ष तोंड केल्यामुळे योग्य तो झाड नसल्यामुळे पक्षांचं स्थलांतर वाढत आहे. पूर्वी घराच्या अंगणात, खिडकीच्या बाहेर चिमणीची चाहूल असे परंतु आता चिमणी सुद्धा नजरेस पडत नाही.

दिवसेंदिवस वातावरण तापत आहे. कारण वृक्षांची संख्या हव्या त्या प्रमाणात नसल्यामुळे वातावरण असंतुलित होत आहे. जीवन सृष्टी साठी महत्त्वपूर्ण ओझोन वायूचा स्थर दिवसेंदिवस कमी होत आहे.ज्यामुळे सूर्यापासून येणाऱ्या अतिनील किरणांचा वेग सरळ सजीव सृष्टीवर पडत आहे. ज्यामुळे अनेक रोगांची उत्पती

होत आहे. देशात , राज्यात पुर सारख्या भयंकर संकटाचा धोका वाढतो आहे. कारण झाडांची तोड मुळे जमिनीची धूप होत आहे. कारणास्तव जमिनीत घळी निर्माण होत आहे. ज्याचा भयंकर परिणाम मानवाला होऊ शकतो. रस्ते, छोट्या मोठ्या इमारती, पुल यांचा खोसळण्याचा धोका अधिक वाढतो. ज्याची किंमत भविष्यात देशाला, मानवाला मोजावी लागू शकते.

निसर्गाने दिलेल्या अमूल्य ठेवाचा मानव नेहमीच अती प्रमाणात वापर करतो. ज्यामुळे मानवालाच त्याचे परिणाम भोगावे लागते. परंतु काही देशात,राज्यात निसर्गाचा समतोल राखण्यासाठी जास्तच जास्त प्रमाणात झाडे लागवड केली जाते आहे. जी खूपच छान बाब आहे. संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमच्या अहवाल अनुसार जगभरात एका दिवसात पन्नास लाख झाडे वृक्षरोपण केली जात आहेत. अर्थातच एका मिनिट मध्ये सात हजार वृक्ष लागवड केली जात आहे.जी खरोखरच कौतुकास्पद बाब आहे. परंतु एक झाड परिपक्व होण्यासाठी सुमारे दहा ते वीस वर्षाचा अवधी घेत असतो.

म्हणजे की, जरी वृक्ष लागवड लाखांच्या संख्येने केली तरी त्याच्या होणारा फायदा हा जवळजवळ दहा वर्षांनी होत असतो.म्हणून वृक्ष तोड वर जास्तीच जास्त नियंत्रण राखणे गरजचे आहे. यासाठी जनजागृती अभियान राबवले पाहिजे.जेणेकरून लोकांना झाडाचे महत्त्व कळेल. आणि होणारी वृक्ष तोड थांबून जाईल.

**Download All Type PDF: https://pdfseva.com/**